Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Volume-3, Issue-4, Oct-2013
Available online at www.aygrt.isrj.net

# समाजशास्त्रातील लोक उठाव विचारवंतांचे योगदान : विशेष संदर्भ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**विष्णू यल्लप्पा विटेकर**

सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, संगमेश्वर कॉलेज, सोलापूर (महाराष्ट्र)

**सारांश :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तीमत्व अष्टपैलू होते. समाजशास्त्रज्ञ, अर्थतज्ञ विधिज्ञ, राज्यशास्त्र, घटनातज्ञ, पत्रकार, कामगार नेते, क्रांतीकारक, लेखक, समाजसुधारक इत्यादी विविध अंगे त्यांच्या व्यक्तीमत्वाची आहेत. परंतु दुदैवाने अनेक संशोधकांनी त्यांच्या विचाराकडे दुर्लक्ष केले असल्याचे निदर्शनास येते. तरी सुद्धा एक प्रसिद्ध कायदेपंडित, घटनातज्ञ राजकारणी धुरंदर दलितांचे उद्धारकर्ते एक कृतीशील सुधारक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नावलौकिक आहे. मानवी हक्क मिळविण्यासाठी व दलित समाजाच्या उत्कर्षासाठी झगडणारे ते एक झुंझार नेते होते.

## प्रस्तावना-

भारतीय समाजात अतिशुद्र समजल्या जाणाऱ्या युगानयुगे खितपत पडलेल्या समाजात आत्मजेत, आत्मविश्वास आणि नवचैतन्य निर्माण करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. दलितांचे कैवारी, दलितांचे पुढारी, कष्ट करणारा पंडित आदि उपाधी त्यांना दिल्या जातात. कारण दलितांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले अविरत कार्य होय. म्हणूनच भारत सरकाने "भारतरत्न" या देशाच्या सर्वोच्च उपाधीने गौरविले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्म अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजात झाल्यामुळे अस्पृश्यतेचे चटके त्यांना लहान पणापासूनच बसत आले होते. म्हणूनच अस्पृश्यता निर्मुलन हे आपले जिवित कार्य बनविले होते. दलित समाजाच्या विकासाठी त्यांनी आपले संपूर्ण जीवन वाहून घेतले. दलित म्हणजे तुडवत गेलेल्या देशातील अन्यायी समाज व्यवस्थेचे, धर्माने विकासाच्या समान संधीपासून अलिप्त ठेवलेला समूह म्हणजे दलित किंवा अस्पृश्य अशा व्यक्तीचा समूह माणूस म्हणून जगण्याचा हक्क हिरावून घेतला. त्याला माणूस म्हणून माणसासारखे जगणे नाकारले, तो दलित गावकुसाबाहेर असलेला सामाजिक चौकटीत बंदिस्त असलेला म्हणजे दलित, सामाजिक, विषमतेला बळी ठरलेला समाज म्हणजे दलित.

मुक्त होण्याच्या प्रयत्नास लागला, डॉ. बाबासाहेबांच्या विचाराने सामाजिक परिवर्तनाला गती देण्याचे, सामाजिक क्रांती घडवून आणण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले.

आंबेडकरवाद हीच दलित साहित्याचे प्रेरणा आणि ध्येय आहे. या संदर्भात उमाकांत रणधिरे म्हणतात, "डॉ. बाबासाहेब हेच दलित साहित्य आणि चळवळीचे आद्य प्रवर्तक आहेत. " ज्योति तेजिवार म्हणतात, "डॉ. बाबासाहेबांनी अंधारातून प्रकाश झोताकडे नेले. अंध दलितांना दृष्टी मिळाली. मुक्त दलितांना वाचा मिळाली." डॉ. बाबासाहेब हेच दलितांचे प्रेरणास्त्रोत आहेत. तेच दलितांचे भाष्यकार आहेत.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार :-

### जाती व्यवस्थे संदर्भात विचार -

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जाती व्यवस्थेसंबंधी विचार अतिशय स्पष्ट होते. अस्पृश्यांना ज्या पद्धतीने वागविण्यात आले यावरून जाती व्यवस्थेसंबंधी विचारांची निर्मिती झाली.

### अस्पृश्य जातीच्या उत्पत्तीची कारण मिमांसा :

अस्पृश्य जातीच्या उत्पत्तीची कारणे मिमांसा स्पष्ट करताना डॉ. बाबासाहेब म्हणतात, अस्पृश्यता ही मानवनिर्मित आहे. दोन वेगवेगळ्या टोळ्यात जेव्हा संघर्ष होऊन एका टोळीचा पराभव केला जातो. तेव्हा पराजित टोळीला विजेत्या टोळीच्या आश्रयाला जावे लागते तेव्हा विजेत्यांनी पराजीतांना गावाबाहेर आकलून दिले. गावावरील आक्रमणाच्या वेळी अशा पराजीतांचा उपयोग करण्यात येत असे. कालांतराने त्यांना

अस्पृश्य ठरविण्यात आले. पुढे छळ, शोषण होवू लागले. सर्व प्रकारची हलकी, निकृष्ट कामे त्यांच्याकडून करून घेण्यात येत असत. अशाप्रकारे अस्पृश्य जातीची उत्पत्ती झाली.

**जाती व्यवस्था अमानवीय -**

जाती व्यवस्था ही अमानवीय असून अस्पृश्यांना प्रगतीला ती घातक ठरली. जाती व्यवस्थेमुळेच समाजाचे विघटन झाले. श्रेष्ठ, कनिष्ठ हा भेद निर्माण होवून एकमेकांत द्वेषभावना निर्माण होवून एकमेकांत द्वेषभावना निर्माण झाली. पौराणिक ग्रंथांना प्रमाण मानल्याने जाती व्यवस्थेकडे बुद्धी प्रामाण्यावादी दृष्टिकोनातून पाहिले जात नाही यांची त्यांना खंत होती.

**चातुर्वर्ण्य समाजाचा आधार होता -**

चातुर्वर्ण्य हा समाजाचा आधार होता. मनुस्मृतीने समान न्याय सामाजिक हक्क नष्ट करून त्यांचा परिणाम शुद्रांवर अन्याय करण्यात आला. त्यामुळे डॉ. बाबासाहेब २५ डिसेंबरख १९२७ रोजी जाहिररीत्या मनुस्मृती दहन केले.अस्पृश्यांवरील अन्याय प्रतिकात्मक विरोध केला.

**व्यक्तीचा दर्जा ठरविण्यात जात हा निकष होता -**

एखादी व्यक्ती एखाद्या जातीत जन्माला येते त्यात त्या व्यक्तीचा दोष नसतो. जात जन्यावर आधारीत असल्यामुळे ती बदलता येत नाही. जाती व्यवस्थेच्या चौकटीत राहणे त्याला मात्र प्रत्येक जातीचा विशिष्ट व्यवसाय असतो. तोच त्यांना करावा अशी त्यांच्याकडून अपेक्षा असते. म्हणजे व्यक्तीचा दर्जा प्राप्त होण्यापासून ते वंचित राहतात. उच्च जातीत जन्मल्यामुळे विशेषाधिकार प्राप्ती आपोआपच होते.

**जातीची बंधने तोडण्यावर भर -** ◆

डॉ. बाबासाहेबांचा जातीचे बंधने तोडण्यावर अधिक भर होता. जाती व्यवस्थेमुळे रोटी-बेटी व्यवहार बंदी झाली त्यामुळे जातीय बंधने अधिक तीव्र झाली हे सर्व नष्ट करण्यासाठी पुनःविवाह आंतरजातीय विवाहावर भर दिला. कारण त्यावेळी जातीबाहेर टाकण्याची प्रथा अस्तित्वात होती. त्यामुळे अनेक जाती निर्माण झाल्या. जाती संस्था दिवसेंदिवस वाढू लागली. जातीमधील संघर्ष वाढू लागले. परिणामतः समाज विघटित झाली. राष्ट्रभक्ती आणि एकता कधी निर्माण होवू शकली नाही. आजही हा प्रश्न तसाच शिल्लक आहे. या सर्व कारणामुळे अस्पृश्यांच्या उद्धारांचे कार्य बाबासाहेबांनी दलित मानवी प्रगतीत सर्वात मागे पडलेला आणि मागे राहिलेला सामान्य वर्ग आहे. हजारो वर्ष जाती संस्थांनी जखडला गेलेल्या माणुसकीला पारखा झालेला जाती व जात वर्ग या संकल्पनेचा आधारावर घेवून येथील मुठभर सत्ताधारी वर्गाने ज्यांची रचना केली, शोषण केले तो दलित अशी दलित या संज्ञेची व्याख्या बाबासाहेबांनी केली आहे. धर्म आणि रुढींच्या जाचामुळे ज्यांची कोंडी झाली तो दलित हजारोवर्ष ज्यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृश्यांनाही दलित म्हटले पाहिजे, असे बाबासाहेब म्हणतात.

**संशोधन पद्धत -**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधनाचा उपयोग करण्यात आला, त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य या विषयावर अनेक विचारवंत, संशोधक, साहित्यिकांनी लिहिले. ग्रंथ स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिले. अनके ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे इत्यादीमधून प्रकाशित झालेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन कार्यावरील लेख इत्यादी दुय्यम साधनावर भर दिला आहे.

**उद्दिष्ट्ये -**

१.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातील दलित समजून घेणे.
२.दलितांवर झालेला अन्यायाची तीव्रता समजून घेणे.
३.डॉ. बाबासाहेब आंबेडकांच्या विचारातून झालेल्या अनेक चळवळी, आंदोलने समजून घेणे.
४.दलित समाजाला जागृत करण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकांचे प्रयत्न.
५.डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार समजून घेणे.

**भारतातील पहिले लोकउठाव विचारांचे समाजशास्त्रज्ञ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील पहिले लोकउठाव विचारांची कृतीशील मांडणी करणारे विचारवंत आणि समाजशास्त्रज्ञ होत. कारण डॉ. बाबासाहेब शिक्षण घेत असताना अस्पृश्य म्हणून त्यांना आतोनात छळ सहन करावा लागला. इतकेच नव्हे तर पुढे उच्च शिक्षण प्राप्त झाल्यानंतर बडोदा संस्थानात सुविद्य अधिकारी असताना देखील त्यांना अस्पृश्यतेचे चटके बसले म्हणूनच त्यांनी अस्पृश्यतेचे सखोल अभ्यास करून दलितांना त्यांच्या घृणास्पद दयनीय स्थितीतून

बाहेर काढण्याचा चंग बांधला आणि त्याकरिता त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा चातुवर्ण्यास विरोध होता. कारण चातुर्वर्णाचा आधार जन्म होता. त्यांचा संबंध श्रमविभाजनाशी जोडला जातो. परंतु त्यांच्या मते, वर्ण व्यवस्थेने श्रमविभागणी केली नसून श्रमिकांची विभागणी केली◆ आहे व त्यांचे प्रतिबिंब जाती व्यवस्थेत उमटले आहे.

जाती व्यवस्थेचा आधार उच्च-निचता व विषमता असून वरच्या जातींना निम्न जातीच शोषण करण्याची सूट आहे. डॉ. बाबासाहेब म्हणतात, आंतरविवाह प्रथा ही जाती व्यवस्था टिकवून ठेवण्याचे महत्त्वाचे साधन आहे. जाती भेदामुळेच समाजाच्या प्रत्येक स्तरात अकुशलता दृष्टीस पडते. जातीप्रथा नष्ट करण्यासाठी बर्हिविवाह ही एक महत्वपूर्ण साधन आहे असे डॉ. बाबासाहेब मानतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या विचारामुळे दलितात आत्मतेज निर्माण झले. त्यांनी कोंडलेल्या भावनांना विचारांना नवी वाट मिळवून दिली. त्यांच्या चळवळीमुळे उपेक्षिताला अस्मिता मिळाली. त्यांचा स्वाभिमान जागृत झाला. डॉ. बाबासाहेबांनी जागृत केलेल्या स्वाभिमानाला अस्मितेच्या स्फूर्ती व प्रेरणा मिळाली. दलित समाजाला बोलते केले. त्यामुळे तोंड बांधलेला समाज बोलू लागला. डॉ. बाबासाहेब दलितांना दास्यात गुलामगिरीत ठेवण्याची रुढी, परंपरा, प्रथा व धर्मशास्त्रांना नकारले. डॉ. बाबासाहेबांनी समाजव्यवस्थेबरोबर समता बंधुता न्याय तत्त्वार समाज निर्माण करण्या मुलगामी विचार दिला. त्यामुळे दलित अन्याय, छळ, गुलामगिरीच्या विळख्यातून करून अस्पृश्यांना मोठा आधार दिला.

**धर्म विषय विचार -**

धर्म माणसाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी आवश्यक आहे. धर्मामुळे आत्माला समाधान मिळते. डॉ. बाबासाहेबांनी धर्माची आवश्यकता मान्य केली. फक्त यासाठी एक अट त्यांनी लावली की, धर्मात उच्च-निचता नसावी स्वातंत्र्यासाठी आणि समानतेला स्थान असावे. धर्माने सर्व माणसांना सारखे समजावे हा त्यांचा धर्माकडे पाहण्याचा दृष्टीकोण होता.

**पाप-पुण्याची कल्पना -**

पाप-पुण्याच्या कल्पनेला तार्किक आधार नाही. मागच्या जन्माला पाप-पुण्यावर जती व्यवस्थेवर आधारीत आहे. अशा प्रकारची भावना समाजात इतकी दृढ झाली की ती नष्ट करणे कठीण आहे. त्यामुळे लोकामध्ये प्रस्तापित समाजव्यवस्थेविरुद्ध बंड करण्याची इच्छा नष्ट झाली. त्यामुळे हिंदू धर्माचे अध:पतन झाले आणि माणसात संकुचितपणाची भाव-ना न्र्मि[illegible] झाली. प्रथम ही भावना दूर करणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या अत्याचारावर राज्याने मर्यादा घालण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य :-**

१.डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यांच्या हक्कासाठी जो व्यापक लढा सुरुवात महाड येथील चवदार तळाच्या सत्याग्रहाने झाली. तळ्याच्या पाण्यावर अस्पृश्यांचा हक्क आहे यांची जाणीव सर्वा-ना [illegible]रू-न दिली.

२.सामाजिक विषमता व उच्च-निचतेचा भेदभाव यांचे समर्थन करणाऱ्या मनुस्मृती या ग्रंथाचा प्रतिकात्मक विरोध करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी २५ डिसेंबर, १९२७ रोजी मनुस्मृतीचे जाहीररित्या दहन केले.

३.हिंदुत्व ही जितकी स्पृश्यांची मालमत्ता आहे. तितकीच ती अस्पृश्यांची आहे. म्हणून मंदिर प्रवेशाला आमचा हक्क मान्य झ ाला पाहिजे हा हक्क सिद्ध करण्यासाठी त्यांनी मासिक येथे आपल्या हजारो अनुयासह २ मार्च, १९३० रोजी काळाराम मंदिर सत्याग्रह केला.

४.डॉ. बाबासाहेबांनी इंग्लडमध्ये भरलेल्या गोलमेज परिषदेमध्ये अस्पृश्यासाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. १९३२ मध्ये इंग्लंडचे तत्कालीन पंतप्रधान रॅास मॅकडोनाल्ड यांनी जातीय निवडा जाहिर करून बाबासाहेबांची मागणी मान्य केली.

५.महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब यांच्यावतीने २५ सप्टेंबर, १९३२ रोजी एक करार झाला. तो करार 'पुणे करार' या नावाने ओळखला जातो. या करारान्वये अस्पृश्यांसाठी कायदे मंडळात राखीव जागा असे उभयपक्षी मान्य करण्यात आले.

६.सुवर्ण हिंदूकडून अस्पृश्यांना कधीच न्याय मिळणार नाही याची जाणीव झाल्याने बाबासाहेबांनी १४ ऑक्टोबर, १९६० रोजी त्यांनी नागपूर येथे आपल्या लाखो अनुयासह बौद्ध धर्माची दिक्षा घेतली.

डॉ. बाबासाहेबांच्या वरील सर्व कृतींना प्रतिकात्मक अर्थ होता त्याद्वारे त्यांनी हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला की, उच्च वर्गियांनी अस्पृश्यांना वर्षानुवर्षे त्यांच्या हक्कापासून प्रसंगी संघर्ष देखील करतील पण आपले हक्क मिळविण्याखेरीज ते स्वस्थ बसणार नाहीत. डॉ. बाबासाहेबांच्या अशी कृतीतून अस्पृश्यांमध्ये जागृती झाली.

**न्ष्[illegible]र्ष -**

१.अस्पृश्य किंवा दलित म्हणजे नक्की कोण हे बाबासाहेबांच्या विचारातून स्पष्ट होते.

२.दलितांवर कशाप्रकारे अन्याय, अत्याचार छळ झाले हे स्पष्ट होते.
३.डॉ. बाबासाहेब हे दलितांचे प्रेरणास्त्रोत होते हे स्पष्ट होते.
४.जात, धर्म आणि दलित या संज्ञाचे सनातनी अर्थ आणि बाबासाहेबांचे बुद्धी प्रामाण्यवादी अर्थ स्पष्ट होतो.
५.बाबासाहेब आंबेडकर विचार समजून घेणे.

**संदर्भ सूची -**

१.धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, पॉप्युलर प्र□ाश-न, (१९६६)
२.धनंजय कीर, विश्वभूषण डॉ. आंबेडकर चरित्र, श्री गजानन बुक डेपो, पुणे (१९७७)
३.डॉ. बी.आर. आंबेडकर, अस्पृश्य मुळचे कोण ? आणि ते अस्पृश्य कसे बनले?
(मराठी अनुवाद प्रा. मा.फ. गांजरे) अशोक प्रकाश-न, -ना□पूर १९७५.
४.डॉ. बी.आर. आंबेडकर, शुद्र पूर्वी कोण होते ? (अनुवाद : चांगदेव खैरमोडे) सुगत प्रकाशन, (१९७४).
५.डॉ. बी.आर. आंबेडकर, 'जातीभेद निर्मुलन' (मराठी अनुवाद : मा.फ. गांजरे) प्रज्ञा प्रकाशन मंडळ, (१९७०).
६.खैरमाडे चां.भ., डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्रे, खंड ५ ते ११.
७.मधु लिमये - डॉ. आंबेडकर एक चिंतन, रचना प्रकाशन, मुंबई (१९८६)
८.मेश्राम व डॉ. योगेंद्र - क्रांती प्रेरणा डॉ. आंबेडकर, पारमिता साहित्य चळवळ, नागपूर (१९८८)
९.डॉ. प्रदिप आगलावे - समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे (२००१)
१०.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती व महानिर्वा□ दि-ना-निमित्त सर्व मासि□ साप्ताहिके, दैनिके या मधून प्रकाशित झालेले डॉ. बाबासाहेबांच्या विचारावरील वेगवेगळे लेख.